कर्जदारांचे लक्ष वेधण्यात येत आहे की, प्रतिभूत मालमत्ता सोडवून घेण्यासाठी उपलब्ध वेळेसंदर्भात कायद्याच्या कलम १३ चे उपकलम (८) ची तरतूद आहे.

विशेषतः कर्जदार व सर्वसामान्य जनतेस येथे सावध करण्यात येते की, सदर मालमत्तेसह कोणताही व्यवहार करू नये आणि सदर मालमत्तेसह व्यवहार केलेला असल्यास त्यांनी **एनएचएफएल**कडे सूचनेत नमूद रक्कम तसेच मागणी सूचनेच्या तारखेपासून करारदराने पुढील व्याज व इतर शुल्क जमा करावे.

कर्ज खाते क्रमांक	कर्जदार व मालमत्ता तपशील	मागणी सूचना दिनांक व रक्कम	ताबा दिनांक	ताबा स्थिती
LNKALLAP-05240043575	१. महेश चंद्रकांत वेखांडे (कर्जदार), २. विजया चंद्रकांत वेखांडे (सह-कर्जदार)	**रु.४,४६,५११/-** (रुपये चार लाख सेहेचाळीस हजार पाचशे अकरा फक्त) **दिनांक: १६ एप्रिल, २०२६**	२१ जुलै, २०२६	सांकेतिक ताबा

मालमत्ता तपशील: घर क्र.५३, क्षेत्र १०८५.०० चौ.फु. बिल्टअप (१००.८ चौ.मी.०, वैतरणा रोड, आंबिवली, समुह ग्रामपंचायत टेंभे, झेडपी शाळा आंबिवलीजवळ, पोस्ट वैतरणा, ता. शहापूर, जिल्हा ठाणे, शहापूर एस.ओ. ठाणे, महाराष्ट्र, भारत-४२१४०१ येथील मालमत्तेच्या जागेचे सर्व भाग व खंड. **पुढीलप्रमाणे चतुसिमाः पुर्वेसः** वास्तविकनुसार; **पश्चिमेसः** वास्तविकनुसार; **उत्तरेसः** वास्तविकनुसार; **दक्षिणेसः** वास्तविकनुसार.

सही/-
प्राधिकृत अधिकारी
ठिकाणः ठाणे
दिनांकः २४.०७.२०२६ **निवास हौसिंग फायनान्स लिमिटेड**

केनरा बैंक Canara Bank

भारत सरकार का उपक्रम — A Govt. of India Undertaking

कॅनरा बँकः अंबरनाथ पश्चिम (२७१०) शाखा

पत्ताः साई कृपा अपार्टमेंट, फडके रोड, फातिमा हाय स्कूलजवळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा ठाणे-४२१५०५.

ई-मेलः cb2710@canarabank.com

लॉकर उघडण्याची खुली सूचना

सर्व संबंधित व्यक्ती आणि सर्वसाधारण जनतेस याद्वारे जाहीर सूचना देण्यात येते की, सदर सूचनेअंतर्गत उल्लेखित व्यक्तींनी **कॅनरा बँके**च्या (ई-सिंडिकेट बँकेच्या शाखा समाविष्ट) निम्नउल्लेखित शाखांमध्ये सेफ डिपॉझिट लॉकर्सची सु प्राप्त केली आहे. संबंधित शाखांनी यापूर्वीच लॉकर भाड्याने घेणारे/एलओए यांना बँकेच्या नोंदीनुसार नवीनतम उपट पत्त्यावर लॉकर भाड्याची थकबाकी भरण्याच्या विनंतीसह वैयक्तिक पत्रे/योग्य पोचपावती (एडी) सह नोंदणीकृत टपाल सूचना पाठविल्या आहेत. या सूचना देऊनही, लॉकर भाड्याने घेणारे/एलओए यांनी शाखेस संपर्क केलेला नाही आणि कर भाडे थकबाकी भरलेली नाही.

निम्न उल्लेखित लॉकर भाड्याने घेणारे आणि त्यांचे कायदेशीर वारस यांना विनंती आहे की, ही **अंतिम सूचना** म्हणून विचारात घ्यावी आणि संबंधित शाखेस सदर सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून **३० दिवसांच्या** आत आवश्यक दस्तऐवजांसह संपर्क करावा आणि लॉकर भाडे थकबाकी भरावी, असे न केल्यास बँकेद्वारे पुढील कोणत्याही सूचना किंवा इशाऱ्याशिवाय भाड्याने घेणारे किंवा त्यांच्या कायदेशीर प्रतिनिधी/वारसांच्या खर्च आणि संपूर्ण जोखमीवर लॉकर्स तोडून उघडण्यात येईल.

अ. क्र.	शाखेचे नाव /संपर्क क्र.	लॉकर क्रमांक	लॉकर भाड्याची थकबाकी	लॉकर भाड्याने घेणाऱ्याचे नाव आणि पत्ता
१	अंबरनाथ पश्चिम मोबा.:७७९८०५६४०९	१७७	१३,८८६.००	गायत्री दीपक शेळके रिनो २००९, वूलन चाळ, भारतीय सेवा मिलजवळ, अंबरनाथ पश्चिम-४२१५०१.

सही/-
दिनांक: २४.०७.२०२६ **प्राधिकृत अधिकारी,**
ठिकाण: अंबरनाथ **कॅनरा बँक**

FCL

फाईनोटेक्स केमिकल लिमिटेड

सीआयएन : L24100MH2004PLC144295

नोंदणीकृत कार्यालय : लेव्हल ४, एरिस्टो हाऊस, तेल्ली गल्ली आणि फडके रोडचे जंक्शन, हबटाऊन सोलारिस समोर, अंधेरी पूर्व, मुंबई, महाराष्ट्र - ४०००६९, भारत. **दूरध्वनी:** +९१- २२ २६५५९१७४, ईमेल: investor.relations@fineotex.com वेबसाइट: www.fineotex.com

३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचा (स्थायी व एकत्रित) अहवाल

कंपनीच्या संचालक मंडळाने २३ जुलै २०२६, रोजी झालेल्या बैठकीत ३० जून २०२६ रोजी संपलेल्या तिमाहीसाठी कंपनीच्या अलेखापरीक्षित आर्थिक निकालांना मान्यता दिली.

सदर निकाल, लेखापरीक्षकांच्या मर्यादित पुनरावलोकन अहवालासह, कंपनीच्या संकेतस्थळावर **https://fineotex.com/investor-relation/** येथे अपलोड करण्यात आले आहेत. तसेच, खालील क्यूआर कोड स्कॅन करून देखील ते पाहता येतील.

फायनोटेक्स केमिकल लिमिटेडसाठी
सही/-
दिनांक : २३ जुलै २०२६ **संजय टिब्रेवाला**
ठिकाण : मुंबई **कार्यकारी संचालक आणि सीएफओ**

टीप: वरील माहिती सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स), २०१५ च्या नियम ४७(१) सह वाचल्या जाणाऱ्या नियम ३३ नुसार देण्यात आली आहे.

जाहीर सूचना

भाग प्रमाणपत्र हरवल्याबद्दल

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, **श्री. विकास शशिकांत ध्रुव** हे **माँ एलान्झा सहकारी गृहनिर्माण संस्था लि.**, सी.टी.एस. क्र.३३६, ३३६/१ ते ४, सोडावाला लेन, बोरिवली पश्चिम, मुंबई-४०००९२ येथील निवासी **फ्लॅट क्र.१८०२** चे सदस्य आहेत, त्यांनी सोसायटीला कळवले आहे की, सोसायटीने जारी केलेले मूळ भाग **प्रमाणपत्र क्र.०२४**, ज्यामध्ये अनुक्रमांक २३१ ते २४० असलेले १० (दहा) शेअर्स आहेत, ते हरवले/गहाळ झाले असून, पूर्ण शोधानंतरही ते सापडत नाहीये.

सदर सदस्याने मूळ भाग प्रमाणपत्राऐवजी **दुय्यम भाग प्रमाणपत्र** मिळवण्यासाठी सोसायटीकडे अर्ज केला आहे.

उपरोक्त भाग प्रमाणपत्राच्या संबंधात कोणताही दावा, हक्क, मालकी, हितसंबंध, धारणाधिकार, बोजा, आक्षेप किंवा मागणी असलेल्या कोणत्याही व्यक्तीने, बँकेने, वित्तीय सोसायटीने किंवा प्राधिकरणाने या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून **१५ (पंधरा)** दिवसांच्या आत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात सोसायटीच्या नोंदणीकृत कार्यालयात स्वाक्षरीकर्त्या व्यक्तीकडे तसे कळवावे.

उपरोक्त कालावधीत कोणताही दावा किंवा आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६०, त्याअंतर्गत तयार केलेले नियम आणि संस्थेच्या उपविधींच्या तरतुदींनुसार सदर सदस्याला दुय्यम भाग प्रमाणपत्र जारी करण्याची कार्यवाही करेल. त्यानंतर सदर भाग प्रमाणपत्रासंबंधी कोणताही दावा किंवा आक्षेप सोसायटीकडून स्वीकारला जाणार नाही.

च्या वतीने व करिता
माँ एलान्झा को-ऑप.हौ.सो.लि.करिता
सही/-
सचिव
ठिकाण: मुंबई दिनांक: २४.०७.२०२६

जाहीर सूचना

याद्वारे जनतेस सूचित करण्यात येते की, **स्व. श्री. अच्युत नवनीतराय देसाई** यांचे फ्लॅट क्र.ए-४०३, ४था मजला, क्षेत्रफळ ३९० चौ.फूट कार्पेट, कमला आशिष रेसिडेन्सी कॉम्प्लेक्स, कमला आशिष नं.३ को-ऑप. हाउसिंग सोसायटी लि., महावीर नगर, डहाणूकर वाडी, कांदिवली (पश्चिम), मुंबई-४०००६७, मुंबई उपनगर जिल्हा येथील जागेमधील ५०% हिस्सा, तसेच सदर सोसायटीने जारी केलेले भाग प्रमाणपत्र क्र.१६ अंतर्गत प्रत्येकी रु.५०/- (रुपये पन्नास फक्त) दर्शनी मूल्य असलेले आणि अनुक्रमांक ७६ ते ८० (दोन्हीसह) असलेले ५ (पाच) शेअर्स हे यांच्या मालकीचे होते (यापुढे **सदर फ्लॅट** आणि **सदर शेअर्स** म्हणून संदर्भ). सदर फ्लॅटमध्ये ५०% मालकी हक्क असलेले सह-मालक **श्री. अच्युत नवनीतराय देसाई** यांचे ०४.०४.२०२५ रोजी कोणतेही मृत्युपत्र न करता निधन झाले; त्यांच्या पश्चात **१) श्रीमती ताराबेन नवनीतराय देसाई (आई)** आणि **२) श्रीमती मैत्री अच्युत देसाई (विवाहित मुलगी)** हे त्यांचे कायदेशीर वारस हयात आहेत. या दोघींनाही त्यांच्या प्रमाणशीर हिश्श्यानुसार उक्त फ्लॅटमधील प्रत्येकी २५% अधिकार, मालकी हक्क आणि हितसंबंध वारसाहक्काने प्राप्त झाले आहेत. या मयत सह-मालकाचा त्यांची पत्नी **श्रीमती पारुल अच्युत देसाई** यांच्याशी घटस्फोट झाला होता; हा घटस्फोट वांद्रे येथील मुंबईच्या ३ ऱ्या कौटुंबिक न्यायालयाने २५.०५.२००४ रोजी पारित एम.जे.याचिका क्र.ए-१४ सन २००३ नुसार केलेल्या आदेशाद्वारे झाला होता. वरील दोन्ही कायदेशीर वारसदारांनी असा निर्णय घेतला आहे की, **श्रीमती मैत्री अच्युत देसाई** या त्यांचे वारसाहक्काने मिळालेले अधिकार **श्रीमती ताराबेन नवनीतराय देसाई** यांच्या बाजूने सोडून देतील; ज्यामुळे **श्रीमती ताराबेन नवनीतराय देसाई** या **स्वर्गीय अच्युत नवनीतराय देसाई** यांच्या जागी सदर फ्लॅटच्या ५०% मालक बनतील. म्हणून, आता **श्रीमती मैत्री अच्युत देसाई** आणि **श्रीमती ताराबेन नवनीतराय देसाई** यांच्या सूचनेनुसार **स्वर्गीय अच्युत नवनीतराय देसाई** यांच्या मालकीच्या संबंधित फ्लॅटमधील ५०% हक्क, मालकी हक्क, हितसंबंध आणि हिस्सा यांबाबत; तसेच विक्री, विनिमय, गहाण, बोजा, धारणाधिकार, देखभाल, ताबा, दान, विश्वस्त व्यवस्था, सुखाधिकार किंवा अन्य कोणत्याही प्रकारे या फ्लॅटवर किंवा त्याच्या कोणत्याही भागावर कोणाचाही काही दावा किंवा आक्षेप असल्यास त्यांनी ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत **गांगण लीगल असोसिएट्सचे कार्यालयः १ला मजला, पितृछाया इमारत, डहाणूकर वाडी, सेंट जोसेफ स्कूल समोर, नोबल हॉस्पिटलच्या बाजुला, कांदिवली व्हिलेज लेन, कांदिवली (पश्चिम), मुंबई**-४०००६७ येथे लेखी स्वरूपात कळवावे. तसेच अशा दाव्यांच्या समर्थनार्थ आवश्यक कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रती सोबत जोडाव्यात. विहित मुदतीनंतर प्राप्त झालेले आणि/किंवा दाव्याच्या समर्थनार्थ कागदपत्रांच्या नोटरीकृत सत्य प्रतींशिवाय सादर केलेले कोणतेही दावे विचारात घेतले जाणार नाहीत आणि संबंधित व्यक्तीने आपला दावा सोडून दिला आहे असे मानले जाईल.

आज दिनांकीत २४ जुलै, २०२६ रोजी

गांगण लीगल असोसिएट्सकरिता
सही/-
ॲड. निकिता व्ही. गांगण
वकील उच्च न्यायालय, कायदेशीर सल्लागार आणि समुपदेशक, मोबाईलः ९८१९८६८४५२
ईमेलः nikeeta@ganganlegal.com

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, श्री. परशुराम भास्कर माळी हे सर्व्हे क्र.८२, हिसा क्र.१, मोजमाप क्षेत्र ०-६६-० हेक्टर-आर क्षेत्र (०-०४-० च्या भांडी खारबा क्षेत्रासह), गाव खडकी बुद्रुक, तालुका भिवंडी, जिल्हा ठाणे या जमिनीच्या मालमत्तेचे मालक आहेत आणि

श्रीमती मोतीबाई भिकाजी ठाकूर आणि श्री. शशिकांत भिकाजी ठाकूर यांच्या दरम्यान नोंदणी क्र.भिवंडी-१५६४/१९८३ अंतर्गत झालेले दिनांक १७.११.१९८३ रोजीचा मुळ बक्षीस खरेदीखत आणि श्री. शशिकांत भिकाजी ठाकूर आणि श्री परशुराम भास्कर माळी यांच्या दरम्यान झालेला नोंदणी क्र.बीव्हीडी-३७९१/१९९४ धारक दिनांक १८.१०.१९८४ रोजीचा विक्री करारनामा हरवला आहे, याबाबत जाहीर सूचना प्रकाशित करण्यासाठी माझ्याकडे संपर्क साधला आहे.

जर कोणा व्यक्तीस सदर मुळ भाग प्रमाणपत्र सापडल्यास त्यांनी कृपया खालील स्वाक्षरीकर्त्याकडे संपर्क करून सुपुर्द करावे. सर्व व्यक्तीस येथे पुढे उपरोक्त सूचनेची नोंद घेण्यास सुचित करण्यात येत आहे आणि येथे सावध करण्यात येत आहे की, उपरोक्त दस्तावेजांच्या आधारावर किंवा मालमत्तेसह कोणताही अन्य तृतीय पक्ष अधिकार किंवा कर्ज प्राप्त करणे किंवा अन्य कोणतीही प्रक्रिया करू नये. जर कोणी व्यक्ती असे करीत असल्यास ते त्यांनी स्वतःच्या जोखिम, मुल्य व परिणामावर करावा आणि असा व्यवहार माझ्या अशिलांवर बंधनकारक असणार नाही.

पुढे जर कोणा व्यक्तीस सदर मालमत्ता किंवा भागावर विक्री, अदलाबदल, तारण, अधिभार, बक्षीस, न्यास, वारसाहक्क, ताबा, भाडेपट्टा, उपभाडेपट्टा, हस्तांतर, वहिवाट, उप-वहिवाट, मृत्युपत्र, परवाना, परिरक्षा, लिस पेन्डन्स, कर्ज, भत्ता, मालकी हक्क, आदेश, निकाल किंवा कोणत्याही न्यायालयाद्वारे वितरीत किंवा मंजूर हुकूमनामा, कर किंवा महसूल किंवा वैधानिक प्राधिकरण आदेश, जप्ती, तजवीज किंवा अन्य इतर प्रकारे कोणताही दावा असल्यास त्यांनी लेखी स्वरुपात वैध दस्तावेजी पुराव्यांसह खालील स्वाक्षरीकर्त्यांना **बी/१०६, १ला मजला, सईद मंझिल कोहौसोलि., पंडित दिनदयाल नगर, बेसीन कॅथलीक बँक लिमिटेड समोर, माणिकपूर, वसई (प.), जिल्हा पालघर-४०१२०२** येथे आजच्या तारखेपासून **१४ दिवसात** कळवावे. अन्यथा असे समजले जाईल की, असा कोणताही दावा अस्तित्वात नाही आणि असल्यास त्याग केले आहेत.

वसई, आज दिनांकीत २४ जुलै, २०२६

सही/-
डेविड एस. डाबरे
वकील उच्च न्यायालय, मुंबई

जाहीर सूचना

याद्वारे सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येत आहे की, **१) श्री. माझ हिफ्झुरहमान बसन, २) श्री. सलमान शरीफ चारोलिया, ३) श्री. अब्दुल रशीद गुलाम रसूल मनासिया, ४) श्री. मुख्तार अब्दुल सेलिया, ५) श्रीमती रुकैया शरीफ सालेमा** हे दुकान क्र.०१, क्षेत्रफळ ८१० चौ.फु. सुपर बिल्टअप क्षेत्र, मॅग्डलीन अपार्टमेंटची इमारत, आय.सी. कॉलनी, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४००१०३ (सदर फ्लॅट) यांचे सदर दुकानातील सर्व १००% मालकी हक्क माझ्या अशिलांना विक्री करण्याचा विचार आहे.

ज्या कोणालाही कोणताही दावा, हक्क, मालकी किंवा हितसंबंध असेल किंवा त्यावर आक्षेप असल्यास त्यांनी सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह तसे मला लेखी कळवावे. पत्ता-**१००३-ई, एक्सप्रेस टॉवर, डायमंड टॉकीज समोर, एल.टी. रोड, बोरिवली (प), मुंबई-४०००९२**, या सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून १४ दिवसांच्या आत, अन्यथा असे मानले जाईल की, कोणतेही दावे नाहीत आणि/किंवा ते सोडून दिले आहेत.

सही/-
श्रेयस के. व्यास
वकील उच्च न्यायालय
ठिकाण: मुंबई दिनांक २४.०७.२०२५

जाहीर सूचना

मौजे-सांताक्रूझ, ता-अंधेरी येथील न. भु. क्र. १४ (पै), १४(१)/१४९ (पै) या **मिळकतीवरील कामधेनू सह. गृह. संस्था या संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत परि-२ मधील अ.क्र. ११० सांताक्रूझ (पूर्व), मुंबई-४०००५५, वरील श्री. लालजी जितनारायण पांडे यांच्या ऐवजी श्रीम. गुलमती सभाजित यादव यांचे नाव समाविष्ट करून पात्रता निश्चित करण्याकरीता अर्ज प्राप्त झाला आहे.** सबब सदर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी हरकत असल्यास ८ दिवसांत खालील सही करणाऱ्या यांच्या कार्यालयात लेखी स्वरूपात नोंदविण्यात याव्यात. मुदतीनंतर प्राप्त हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी, असे याव्दारे जाहीर असे.पत्ता :कक्ष क्र. ३११, दुसरा मजला,गृहनिर्माण भवन, कलानगर, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०० ०५१

करीता – सक्षम प्राधिकारी तथा भूव्यवस्थापकमुंबई मंडळ

ठिकाण : मुंबई
दिनांक : २४/०७/२०२६

जाहीर सूचना

याद्वारे सर्व जनतेस सूचित करण्यात येते की, कै. श्री. के. सदाशिव राव हे फ्लॅट क्र.१३१०, २रा मजला, इमारत क्र.३७, टिळक सिद्धेश्वर को-ऑप. हाउसिंग सोसायटी लि. (सोसायटी), सीटीएस क्र.३२, ३२ (१६ ते २७), गाव चेंबूर, टिळक नगर, चेंबूर, मुंबई-४०००८९ येथील फ्लॅटचे (जुना फ्लॅट) मूळ मालक होते. श्री. के. सदाशिव राव यांचे मुंबई येथे ०३.०१.२००१ रोजी निधन झाले. त्यानंतर त्यांच्या पत्नी श्रीमती सुनंदा सदाशिव राव यांचेही मुंबई येथे ०९.०३.२०१० रोजी निधन झाले आणि हिंदू कायद्यानुसार १) श्रीमती वंदना बी. सालियन (मुलगी), २) श्रीमती सुधा आर. राव (मुलगी) आणि ३) श्रीमती संगीता एस. हेब्बार (मुलगी) हे त्यांचे कायदेशीर वारसदार आहेत.

दिनांक १४.१२.२०१२ रोजीच्या प्रतिज्ञापत्राद्वारे १) श्रीमती वंदना बी. सालियन, २) श्रीमती सुधा आर. राव आणि ३) श्रीमती संगीता एस. हेब्बार यांनी स्पष्टपणे घोषित केले की त्या कै. श्रीमती सुनंदा सदाशिव राव आणि कै. श्री. के. सदाशिव राव यांच्या एकमेव हयात कायदेशीर वारस आहेत आणि त्यांनी सोसायटीला विनंती केली की सदर भाग प्रमाणपत्र क्र.१४ त्यांच्या नावावर हस्तांतरित करावे. सदर प्रतिज्ञापत्राची दखल घेऊन आणि सदर जुन्या फ्लॅटचा ताबा त्यांच्याकडे असल्याचे विचारात घेऊन, सोसायटीने त्यांच्या नावे २९.०९.२०१९ रोजीचे भाग प्रमाणपत्र क्र.१४ जारी केले आहे.

दिनांक २१.०१.२०२५ रोजी कुर्ला-५ येथील दुय्यम निबंधक कार्यालयात केआरएल-५/१६१३/२०२५ अंतर्गत नोंदणीकृत दिनांक २० जानेवारी २०२५ रोजीच्या कायमस्वरूपी पर्यायी निवासासाठीच्या करारनाम्याद्वारे, मे. रिअल इन्फ्रास्ट्रक्चर कंपनीने १) श्रीमती वंदना बी. सालियन, २) श्रीमती सुधा आर. राव आणि ३) श्रीमती संगीता एस. हेब्बार यांना फ्लॅट क्र.ए-९०४, ९वा मजला, ए विंग, गामी अँड जयदीप एलान्झा टिळक सिद्धेश्वर को-ऑप. हाउसिंग सोसायटी लि., गाव चेंबूर, टिळक नगर, चेंबूर, मुंबई-४०००८९ (नवीन फ्लॅट) येथील फ्लॅट हा, सदर जुन्या फ्लॅटच्या मोबदल्यात, विनामूल्य आणि त्यात नमूद केलेल्या अटी व शर्तीवर देण्यात येत आहे.

वरील फ्लॅट्सबाबत कोणताही हक्क, मालकीहक्क, हितसंबंध, हिस्सा किंवा कोणत्याही स्वरूपाची मागणी असलेल्या किंवा तसा दावा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने ही सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत सर्व संबंधित कागदपत्रांसह खाली सही करणाऱ्या व्यक्तीस लेखी स्वरूपात कळवावे. तसे न केल्यास, असे कोणतेही हक्क, दावे किंवा मागण्या असल्यास त्या सोडून दिल्या आहेत किंवा त्यांवरचा हक्क त्यागला आहे असे मानले जाईल.

आज दिनांकीत २४ जुलै, २०२६ रोजी

ॲड. नवीद मेमन
४०६, मोरिया इस्टेट, न्यू लिंक रोड, अंधेरी (प), मुंबई-४०००५३.
ईमेलः navidm.adv@gmail.com
९९६७४५९९९३

परिशिष्ट-१६
(उप-विधी क्र.३४ अन्वये)

मयत सभासदाचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेत असलेले हितसंबंध व भाग हस्तांतरीत करण्याबाबत हक्क मागण्या किंवा हरकती मागविण्यासाठी द्यावयाच्या नोटिशीचा नमुना.

श्री. मधुकर कृष्णराव माकोडे हे **द महान को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि.,** यांचा पत्ताः आनंद नगर, दहिसर पुर्व, मुंबई-४०००६८ येथील सोसायटीचे सदस्य आहेत आणि सोसायटीतील बी विंग्या ०४थ्या मजल्यावरील फ्लॅट क्र.२० चे धारक आहेत, यांचे ०७.११.२०१२ रोजी कोणतेही नामांकन न करता निधन झाले. त्यांच्या पश्चात त्यांचे भाऊ **१) श्री. सुधाकर क. माकोडे** आणि **२) श्री. प्रभाकर क. माकोडे** हे सदर फ्लॅटचे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत. सदर **श्री. प्रभाकर क. माकोडे** यांचे ०३.०६.२०१७ रोजी निधन झाले, त्यांच्या पश्चात **१) श्रीमती कांता प्रभाकरराव माकोडे (पत्नी), २) श्री. मिलिंद प्रभाकरराव माकोडे (मुलगा), ३) कुमारी वैशाली प्रभाकरराव माकोडे (मुलगी)** आणि **(४) श्रीमती उज्वला संजय देंडाव (विवाहित मुलगी)** हे सदर फ्लॅटचे एकमेव कायदेशीर वारसदार आहेत.

सोसायटीद्वारे सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील, मयत सभासदाचे सोससायटीच्या भांडवल/मालमत्तेतील सदर शेअर्स/हित हस्तांतरण होण्यास वारस किंवा अन्य दावेदारी/आक्षेप घेणारे यांच्याकडून काही दावे किंवा आक्षेप असल्यास ते ह्या सूचनेच्या प्रसिध्दीपासून **१५ (पंधरा) दिवसांत** शेअर्स व हितसंबंधाच्या दुय्यम भाग प्रमाणपत्र वितरणासाठी दावा/आक्षेपांच्या पृष्ठ्यर्थ अशी कागदपत्रे आणि अन्य पुरावाच्या प्रतींसह मागविण्यात येत आहेत. वर दिलेल्या मुदतीत जर काही दावे/आक्षेप प्राप्त झाले नाहीत, तर मयत सभासदाच्या सोसायटीच्या भांडवल/मिळकतीमधील शेअर्स व हितसंबंधाशी सोसायटी उपविधीतील तरतुदींमधील दिलेल्या मार्गाने व्यवहार करण्यास सोसायटी मोकळी असेल. काही दावे/आक्षेप सोसायटीने प्राप्त केले तर, सोसायटीच्या उपविधीतील तरतुदींनुसार त्यावर सोसायटी कार्यवाही करेल. सोसायटींच्या नोंदणीकृत उपविधींची प्रत दावेदार/आक्षेपकाव्दारे निरीक्षणाकरिता सोसायटीच्या कार्यालयात/सोसायटी सचिवाकडे सदर सूचना प्रसिध्दीच्या तारखेपासून कालावधी समाप्तीच्या तारखेपर्यंत **स.१०.३० ते दु.०१.००** दरम्यान उपलब्ध आहेत.

च्या वतीने व करिता
सही/-
महान को-ऑप.हौ.सो.लि.
ठिकाणः मुंबई दिनांकः २४.०७.२०२६

सूचना

श्री. अशोक गोयल हे द झहरा को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पत्ताः डॉ. ई मोझेस रोड, वरळी, मुंबई-४०००१८ येथील सोसायटीचे सदस्य आहेत आणि सोसायटीच्या इमारतीमधील २२व्या मजल्यावरील सोसायटीच्या नोंदीनुसार फ्लॅट क्र.२२०१/२२०२ चे धारक आहेत, यांचे ०१.०५.२०२६ रोजी निधन झाले.

सोसायटी याद्वारे, मयत सदस्याच्या भांडवलातील/मालमत्तेतील सदर शेअर्स आणि हिश्श्याच्या हस्तांतरणासंदर्भात, वारसदार किंवा वारसदारांकडून किंवा इतर दावेदार/आक्षेपकर्त्यांकडून ही सूचना प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या कालावधीत दावे किंवा आक्षेप आमंत्रित करत आहे. दावेदारांनी मयत सदस्याच्या भांडवलातील/मालमत्तेतील शेअर्स आणि हिश्श्याच्या हस्तांतरणासंदर्भातील त्यांच्या दाव्यांच्या/आक्षेपांच्या समर्थनार्थ आवश्यक कागदपत्रांच्या आणि इतर पुराव्यांच्या प्रती सोबत जोडणे आवश्यक आहे. वर नमूद केलेल्या कालावधीत कोणतेही दावे/आक्षेप प्राप्त न झाल्यास, सोसायटी मयत सदस्याच्या भांडवलातील/मालमत्तेतील शेअर्स आणि हिश्श्याबाबत, सोसायटीच्या उप-विधींमध्ये नमूद केलेल्या पद्धतीनुसार व्यवहार करण्यास स्वतंत्र असेल.

सोसायटीच्या नोंदणीकृत उप-विधींची एक प्रत, दावेदार/आक्षेपकर्त्यांना सूचनेच्या प्रकाशनाच्या तारखेपासून ते मुदत संपेपर्यंत सोसायटीच्या कार्यालयात (स.११ ते दु.४ या वेळेत) तपासणीसाठी उपलब्ध आहे.

च्या वतीने व करिता
ठिकाणः वरळी **झहरा कोहौसोलि.**
दिनांकः २४.०७.२०२६ **मा. सचिव**

जाहीर सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, आमचे अशील श्री. हरीशकुमार थिम्मप्पा पुजारी, श्री. सतीशकुमार थिम्मप्पा पुजारी, श्री. दिनेशकुमार थिम्मप्पा पुजारी आणि श्रीमती रंजिता दिनेश अमीन, हे स्वर्गीय श्री. मणिपुरा थिम्मप्पा पुजारी आणि स्वर्गीय श्रीमती ललिता थिम्मप्पा पुजारी यांचे एकमेव चार कायदेशीर वारसदार आहेत, ज्यांचा पत्ता फ्लॅट क्र.१०३५, क्षेत्रफळ सुमारे २२० चौ.फु. कार्पेट, इमारत क्र.३२, टागोर नगर अष्टविनायक कोहौसोलि., विक्रोळी (पूर्व), मुंबई-४०००८३, यांच्यासोबत प्रत्येकी रु.५०/- किमतीचे ५ शेअर्स, ज्यांचे प्रमाणपत्र क्र.१९ धारक अनुक्रमांक ९१ ते ९५ आहेत, हे सदर फ्लॅट आणि शेअर्स सोसायटीच्या नोंदी व भांडवलामध्ये त्यांच्या संयुक्त नावावर हस्तांतरित करण्यास इच्छुक आहेत.

उपरोक्त नमूद फ्लॅट आणि शेअर्स, किंवा त्याच्या कोणत्याही भागावर विक्री, अदलाबदल, हस्तांतरण, भाडेपट्टा, पोट-भाडेपट्टा, भाडेकरार, गहाण, नामनिर्देशन, परवाना, सुखाधिकार, देणगी, वारसा, बोजा, धारणाधिकार, प्रलंबित खटला, कोणत्याही विश्वस्त संस्थेअंतर्गत लाभदायी हक्क/हितसंबंध, मुदतपूर्व किंवा अग्रक्रय हक्क किंवा कोणत्याही कराराअंतर्गत किंवा इतर कोणत्याही प्रकारे (त्याच्या कोणत्याही भागाच्या ताब्याच्या दाव्यासह) कोणत्याही स्वरूपाचा कोणताही हक्क, मालकी, हितसंबंध, दावा किंवा मागणी असलेल्या किंवा दावा करणाऱ्या कोणत्याही पक्षाला किंवा व्यक्तीला, याद्वारे आवाहन करण्यात येत आहे की, त्यांनी या सूचनेच्या तारखेपासून ०७ (सात) दिवसांच्या कालावधीत सहाय्यक कागदोपत्री पुराव्यासह खाली दिलेल्या पत्त्यावर आम्हाला लेखी स्वरूपात तसे कळवावे; असे न केल्यास, असे गृहीत धरले जाईल की, कोणत्याही पक्षाचा किंवा व्यक्तीचा त्याच्या कोणत्याही भागावर कोणत्याही स्वरूपाचा कोणताही दावा अस्तित्वात नाही. त्यानंतर आमचे अशील सल्ला दिल्यास, प्रस्तावित व्यवहार पुढे चालू ठेवतील आणि कोणताही पक्ष किंवा व्यक्ती, त्यांचे काही दावे असल्यास ते सोडून देऊन, सदर फ्लॅटच्या मालकी हक्कास संमती देत आहे असे मानले जाईल. कृपया नोंद घ्यावी की, सदर ७ (सात) दिवसांचा कालावधी संपल्यानंतर प्राप्त झालेला कोणताही दावा आमच्या अशिलांकडून दुर्लक्षित केला जाईल, जणू काही असा कोणताही दावा आमच्या ग्राहकांना प्राप्त झालाच नव्हता.

आज दिनांकीत २३ जुलै, २०२६

सही/-
कुमार अँण्ड कं.
(वकील आणि कायदेशीर सल्लागार)
कार्यालय क्र.४०४, इमारत क्र.१४४, युनिक प्राईड, विक्रोळी न्यायालयासमोर, कन्नमवार नगर-२, विक्रोळी (पूर्व), मुंबई-४०००८३.
ई-मेलः suren@kumaradvocates.com

जाहीर नोटीस

याद्वारे सर्वसामान्य जनतेस सूचित करण्यात येते की, माझे अशील श्री सदानंद सेसप्पा कोटियन व श्री जगदीश रामा पुजारी, दोघेही रा. कुसुमानंद को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पं. नेहरू रोड, सरस्वत कॉलनी, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१, ता. कल्याण, जि. ठाणे, हे कुसुमानंद को-ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी लि., पं. नेहरू रोड, सरस्वत कॉलनी, डोंबिवली (पूर्व) - ४२१२०१ येथील दुकान क्र. ०३, तळमजला, तसेच त्यास अनुसंगिक असलेले सदर सहकारी गृहनिर्माण संस्थेतील समभाग व हितसंबंध यांचे कायदेशीर संयुक्त मालक असून, दिनांक ३१/१२/१९९९ रोजीच्या नोंदणीकृत विक्री करारनाम्याद्वारे त्यांनी सदर मालमत्ता संपादित केली असून तिच्या शांततापूर्ण, कायदेशीर व विशेष ताब्यात आहेत.

यापुढे असेही जाहीर करण्यात येते की, मे. शिवा एंटरप्रायझेस (बिल्डर / प्रवर्तक), सौ. कुसुम सदानंद चव्हारे (मूळ मालक / पुष्टीकरण देणारी पक्षकार) आणि श्री गणपती आबाजी अमृतसागर (खरेदीदार) यांच्यामध्ये दिनांक ०३/०३/१९८९ रोजी निष्पादित झालेला व सदर मालमत्तेच्या मालकी हक्काच्या साखळीतील प्रथम व अत्यंत महत्त्वाचा दस्तऐवज असलेला मूळ विक्री करारनामा हा दिनांक २०/०६/२०२६ रोजी किंवा त्याच्या आसपास नकळत हरविला / गहाळ झाला आहे. सदर मूळ दस्तऐवजाचा शोध घेण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न व कसून शोध घेण्यात आला; तथापि तो उपलब्ध होऊ शकलेला नाही व तो कायमस्वरूपी हरविल्याचा समज करण्यात येत आहे.

ज्या कोणास सदर मूळ दस्तऐवज सापडला असेल किंवा सदर मूळ विक्री करारनाम्याबाबत अथवा वरील मूद मालमत्तेबाबत कोणताही हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, दावा, मागणी, धारणाधिकार, भार, गहाण हक्क, बोजा अथवा अन्य कोणताही अधिकार असल्याचा दावा करावयाचा असेल, अशा सर्व व्यक्तींनी या सूचनेच्या प्रसिद्धीच्या दिनांकापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत त्यासंबंधीचे सर्व पुरावे व कागदपत्रांसह आपला लेखी दावा अधोहस्ताक्षरी यांचेकडे सादर करावा.

निर्धारित मुदतीत कोणताही दावा किंवा हरकत प्राप्त न झाल्यास कोणत्याही व्यक्तीस सदर दस्तऐवज अथवा मालमत्तेबाबत कोणताही हक्क, दावा किंवा हरकत नसल्याचे गृहीत धरले जाईल. त्यानंतर माझे अशील संबंधित दुय्यम निबंधक अथवा अन्य सक्षम प्राधिकरण यांच्या कार्यालयातून सदर विक्री करारनाम्याची प्रमाणित प्रत व/किंवा दुय्यम प्रत प्राप्त करून घेतील तसेच कायद्यानुसार सदर मालमत्तेबाबत पुढील कार्यवाही करतील. याबाबत कोणत्याही व्यक्तीस स्वतंत्रपणे पुढील सूचना दिली जाणार नाही.

स्थळ : डोंबिवली
दिनांक : २४/०७/२०२६ **सही/-**
ॲड. समीर श्रीकांत विसपुते अधिवक्ता व नोटरी

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यात येते की,मौजे-नवागाव, तालुका कल्याण, जिल्हा ठाणे,येथील सर्व्हे नं.२९२ हिस्सा नं. पैकी यावरील श्री सिद्धी विनायक को.ऑप.हौसिंग सोसा.ली, मधील सदनिका नं. ए/२६,चौथा मजला क्षेत्रफळ ४६.०९ चौ.मी. हि सदनिका कै.तुकाराम काळू कदम यांचे मालकीची होती त्यांचे निधन झाल्यानंतर, त्यांच्या सर्व कायदेशीर वारसांनी सदर सदनिकेवरील आपला हक्क सोडून देत, श्री.संतोष तुकाराम कदम यांच्या नावे 'हक्कसोड पत्र' नोंदवून दिलेले आहे.

तरी सदर मालमत्तेवर (सदनिकेवर) इतर कोणत्याही व्यक्तीचा, वारसाचा, किंवा संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, हितसंबंध, वारसा हक्क, दान, गहाण, लीन (Lien), किंवा इतर कोणत्याही प्रकारचा बोजा असल्यास, त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ (पंधरा) दिवसांच्या आत खालील पत्त्यावर आपल्या दाव्याच्या किंवा हक्काच्या मूळ कागदपत्रांच्या सत्यप्रतीसह लेखी स्वरूपात हरकत नोंदवावी.मुदतीमध्ये कोणाचीही कसलीही हरकत किंवा आक्षेप न आल्यास, सदर मालमत्तेवर कोणाचाही कसलाही हक्क,अधिकार व बोजा नाही, असे समजून तो सोडून दिला (Waived) आहे असे गृहीत धरले जाईल. आमचे अशिल श्री. संतोष हे बँकेकडून कर्ज प्रक्रिया पूर्ण करतील. मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत किंवा दावा विचारात घेतला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

कल्याण, दिनांकः २४/०७/२०२६. सही/—
कार्या.:एनपी/३, एन.जे.हाऊस, कल्याण न्यायालयासमोर, ॲड. सागर प्रकाश करडक
पोस्ट ऑफिसजवळ, मार्केट रोड, कल्याण(प), जिल्हा—ठाणे. मो. ९००४३०८८२२

नॅशनल स्टॅण्डर्ड (इंडिया) लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालयः ४१२, ४था मजला, १७जी, वर्धमान चेंबर, कावसजी पटेल रोड, हॉर्निमन सर्कल, फोर्ट, मुंबई-४००००१. **ई-मेलः**investors.nsil@lodhagroup.com, **दूर.:**+९१-२२-६१३३४४००
सीआयएनः एल२७१०९एमएच१९६२पीएलसी२६५९५९, **वेबसाईटः**www.nsil.net.in,

व्हिडिओ कॉन्फरन्स/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे आयोजित होणाऱ्या ६३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेसंबंधी माहिती

सदस्यांनी कृपया नोंद घ्यावी की, कंपनीची ६३वी वार्षिक सर्वसाधारण सभा (एजीएम) ही कंपनी कायदा, २०१३ (कायदा), त्याअंतर्गत बनवलेले नियम आणि सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ (लिस्टिंग रेग्युलेशन्स) च्या लागू तरतुदींनुसार, तसेच दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या सर्वसाधारण परिपत्रक क्र.०३/२०२५ आणि कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालयाने (एमसीए) वेळोवेळी या संदर्भात जारी केलेल्या विविध परिपत्रकांनुसार (यापुढे एकत्रितपणे परिपत्रके म्हणून संबोधले जाईल), सभेच्या सूचनेत नमूद केलेला व्यवसाय पार पाडण्यासाठी **शुक्रवार, २८ ऑगस्ट, २०२६ रोजी दु.०३.००वा.(भाप्रवे)** व्हिडिओ कॉन्फरन्स (व्हीसी)/इतर दृकश्राव्य माध्यमांद्वारे (ओएव्हीएम) आयोजित केली जाईल.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनात, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाच्या इलेक्ट्रॉनिक प्रती, कंपनी/रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट (आरटीए)/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे नोंदणीकृत ईमेल पत्ते असलेल्या सर्व सदस्यांना पाठवल्या जातील. ६३व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालासह, कंपनीच्या www.nsil.net.in या वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंज म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या वेबसाइटवर आणि एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (एमयूएफजी/आरटीए) च्या https://instavote.linkintime.co.in या वेबसाइटवर देखील उपलब्ध असेल. सूचनेच्या आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाच्या छापील प्रती, ज्या सदस्यांनी विनंती केली आहे त्यांना पाठवल्या जातील. याव्यतिरिक्त, लिस्टिंग नियमावलीच्या नियम ३६ नुसार, कंपनी अशा भागधारकांना पत्र पाठवत आहे ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/आरटीए/डीपीकडे नोंदणीकृत नाहीत, ज्यामध्ये आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाची वेबलिंक दिली आहे.

वार्षिक अहवालासोबत वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना मिळवण्यासाठी ई-मेल पत्ते नोंदणी/अद्ययावत करण्याची पद्धतः

जे सदस्य आपला ई-मेल पत्ता नोंदणी/अद्ययावत करू इच्छितात, त्यांना विनंती आहे की त्यांनी खालील सूचनांचे पालन करावेः

डिमॅट स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी	तुमच्या संबंधित डीपीजनी दिलेल्या प्रक्रियेनुसार तुमच्या डिमॅट खात्यामधील तपशील नोंदवा/अद्ययावत करा.
भौतिक स्वरूपात धारण केलेल्या शेअर्ससाठी	सदस्यांनी नोंद घ्यावी की, सेबी मास्टर परिपत्रक क्र.सेबी/एचओ/एमआयआरएसडी/पीओडी-१/पी/सीआयआर/२०२४/३७ दिनांक ७ मे, २०२४ च्या तरतुदींनुसार, भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या सर्व सदस्यांना त्यांच्या संबंधित फोलिओ क्रमांकासाठी पॅन, नामनिर्देशनाची निवड, संपर्क तपशील (पॅन आणि मोबाईल क्रमांकासह पोस्टल पत्ता), बँक खात्याचा तपशील आणि नमुना स्वाक्षरी देणे अनिवार्य आहे. सदस्य कंपनीच्या आरटीए म्हणजेच एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीचे नाव लिंक इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड) कडे विहित नमुना आयएसआर-१ आणि इतर संबंधित फॉर्ममध्ये तपशील नोंदणी/अद्ययावत करू शकतात. सदस्य कंपनीच्या www.nsil.net.in या वेबसाइटवरून किंवा आरटीएच्या https://web.in.mpms.mufg.com या वेबसाइटवरून विहित फॉर्म डाउनलोड करू शकतात.

ई-मतदानाद्वारे मतदान करण्याची पद्धतः

सदस्यांना एजीएमच्या सूचनेत नमूद केलेल्या कामकाजावर दूरस्थ ई-मतदान प्रणालीद्वारे (रिमोट ई-व्होटिंग) तसेच एजीएम दरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे दूरस्थपणे मतदान करण्याची संधी मिळेल. दूरस्थ ई-मतदानासह ई-मतदानासाठीच्या सविस्तर सूचना कंपनीच्या सदस्यांना एजीएमच्या सूचनेत देण्यात येतील.

वरील माहिती कंपनीच्या सर्व सदस्यांच्या माहितीसाठी आणि फायद्यासाठी जारी केली जात आहे आणि ती लागू असलेल्या परिपत्रकांच्या अनुपालनात आहे.

सदस्य कंपनीच्या आरटीएशी येथे संपर्क साधू शकतातः
एमयूएफजी इंटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड
रसोई कोर्ट, ५वा मजला,
२०, सर आर एन मुखर्जी रोड,
कोलकाता-७००००१.
दूर.क्र.:+९१ २२ ४९१८६०००/६२७०
ईमेलः investor.helpdesk@in.mpms.mufg.com
वेबसाइटः www.in.mpms.mufg.com

नॅशनल स्टॅण्डर्ड (इंडिया) लिमिटेडकरिता
सही/-
हितेश मार्थक
ठिकाणः मुंबई **कंपनी सचिव व सक्षम अधिकारी**
दिनांकः २३.०७.२०२६ **सदस्यत्व क्र.ए१८२०३**

बॉम्बे वायर रोप्स लिमिटेड

सीआयएनः एल२४११०एमएच१९६१पीएलसी०११९२२
४०१/४०५, जॉली भवन १, १० न्यू मरीन लाईन्स, मुंबई ४०००२०
ई-मेलः contactus@bombaywireropts.com

६५वी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, बॉम्बे वायर रोप्स लिमिटेड ('कंपनी') च्या सदस्यांची ६५ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ('एजीएम') शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२६ रोजी दुपारी १२:०० वा. भाप्रवे किलाचंद कॉन्फरन्स रूम, दुसरा मजला, आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्री, आयएमसी बिल्डिंग, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२० येथे आयोजित करण्यात येईल. कंपनी कायदा, २०१३ आणि त्याअंतर्गत बनवलेले नियम, तसेच सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (सेबी) (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) विनियम, २०१५, यांसोबतच सहकार मंत्रालयाने जारी केलेले सर्वसाधारण परिपत्रक क्र. १४/२०२० दिनांक ०८ एप्रिल, २०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र. १७/२०२० दिनांक १३ एप्रिल, २०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र. २०/२०२० दिनांक ५ मे, २०२०, सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०२/२०२१ दिनांक १३ जानेवारी, २०२१, सर्वसाधारण परिपत्रक क्र. २१/२०२१ दिनांक १४ डिसेंबर, २०२१, सर्वसाधारण परिपत्रक क्र. ०२/२०२२ दिनांक ५ मे, २०२२ आणि सर्वसाधारण परिपत्रक क्र. १०/२०२२ दिनांक २८ डिसेंबर, २०२२ आणि इतर लागू परिपत्रके यांच्या सर्व लागू तरतुदींचे पालन करून वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केल्यानुसार कामकाज करण्यासाठी (एमसीए) आणि सेबीचे दिनांक १२ मे २०२०, १५ जानेवारी २०२१, १३ मे २०२२ आणि ५ जानेवारी २०२३ चे परिपत्रक (एकत्रितपणे संबंधित परिपत्रके म्हणून संदर्भित) विचारात घेतले आहेत.

संबंधित परिपत्रकांच्या अनुपालनात, वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, प्रॉक्सी फॉर्म आणि वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल, २२ जुलै, २०२६ रोजी केवळ इलेक्ट्रॉनिक पद्धतीने कंपनीच्या त्या सर्व सदस्यांना पाठवण्यात आला आहे, ज्यांचे ईमेल पत्ते सीडीएसएल/एनएसडीएल (डिपॉझिटरीज) किंवा कंपनी/निबंधक आणि भाग हस्तांतरण प्रतिनिधी उदा. पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रा. लि. यांच्याकडे नोंदणीकृत आहेत. ज्या भागधारकांनी त्यांचे ई-मेल आयडी डीपी किंवा कंपनी/भाग हस्तांतरण प्रतिनिधी यांच्याकडे नोंदणीकृत केलेले नाहीत, त्यांना आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या वार्षिक अहवालाची वेबलिंक आणि अचूक मार्ग देणारे पत्र पाठवले जात आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना, उपस्थिती पत्रक आणि आर्थिक वर्ष २०२५-२६ चा वार्षिक अहवाल www.bombaywire ropes.com या वेबसाइटवर, पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रा. लि. च्या https://evoting.purvashare.com या वेबसाईटवर आणि स्टॉक एक्सचेंज उदा. बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या वेबसाईटवर देखील उपलब्ध आहे.

कंपनीचा संपूर्ण वार्षिक अहवाल २०२६ पाहण्यासाठीची लिंक https://www.bombaywireropes.com/Uploads/BWR_65th_ANNUAL_report_2026_20260722_062758_0cc72298.pdf ही आहे.

सदस्यांनी हे देखील लक्षात घ्यावे की, कंपनीने नियुक्त केलेल्या रिमोट ई-मतदान सेवा प्रदाता, म्हणजेच पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, यांच्याशी संबंधित असलेल्या टीप क्र. १८ आणि २२ मधील अनवधानाने झालेली चूक दुरुस्त करण्यासाठी, सदर सूचनेला दिनांक २३ जुलै, २०२६ रोजी एक शुद्धिपत्रक जारी करण्यात आले होते. सदर शुद्धिपत्रक हे सूचनेचा अविभाज्य भाग आहे आणि ते कंपनीच्या www.bombaywireropes.com या वेबसाईटवर, पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडच्या https://evoting.purvashare.com या वेबसाईटवर आणि बीएसई लिमिटेडच्या www.bseindia.com या वेबसाईटवर उपलब्ध आहे.

कंपनी कायदा, २०१३ (कायदा) च्या कलम १०८ च्या तरतुदींनुसार सहवाचिता सुधारित कंपनी (व्यवस्थापन आणि प्रशासन) नियम, २०१४ च्या नियम २०, सिक्युरिटीज अँण्ड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) नियम, २०१५ चा नियम ४४ आणि इन्स्टिट्यूट ऑफ कंपनी सेक्रेटरीज ऑफ इंडियाने जारी केलेल्या सर्वसाधारण सभेवरील सचिवीय मानकानुसार, कंपनी शुक्रवार, ७ ऑगस्ट, २०२६ (कट-ऑफ तारीख) रोजी वास्तविक किंवा डिमटेरियलाइज्ड स्वरूपात इक्विटी शेअर्स धारण करणाऱ्या आपल्या सदस्यांना, ६५व्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या प्रत्येक बाबीवर, पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेडने प्रदान केलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे, वार्षिक सर्वसाधारण सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त इतर ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक पद्धतीने (रिमोट ई-व्होटिंग) मतदान करण्याची सुविधा प्रदान करत आहे. सदस्यांनी खालील बाबींची नोंद घ्यावीः

१. केवळ तेच सदस्य, ज्यांची नावे डिपॉझिटरीजद्वारे ठेवल्या जाणाऱ्या सदस्य नोंदवहीमध्ये किंवा लाभार्थी मालकांच्या नोंदवहीत (इलेक्ट्रॉनिक भागधारणेच्या बाबतीत) अंतिम तारखेपर्यंत म्हणजेच शुक्रवार, ०७ ऑगस्ट, २०२६ पर्यंत नोंदवलेली आहेत, तेच रिमोट ई-मतदान, वार्षिक सर्वसाधारण सभेत सहभाग आणि वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान मतदान करण्याच्या सुविधेचा लाभ घेण्यास पात्र असतील;
२. जर एखादी व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना पाठवल्यानंतर परंतु ई-मतदानाच्या अंतिम तारखेला किंवा त्यापूर्वी कंपनीची सदस्य झाली असेल, तर ती व्यक्ती वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या पद्धतीने ओळखपत्रे मिळवू शकते;
३. रिमोट ई-मतदान कालावधी मंगळवार, ११ ऑगस्ट, २०२६ रोजी स.९.०० वा. (भाप्रवे) सुरू होईल आणि गुरुवार, १३ ऑगस्ट, २०२६ रोजी सायं. ५.०० वा. (भाप्रवे) संपेल. त्यानंतर पूर्वाद्वारे ई-मतदान पध्दत अक्षम केले जाईल;
४. एकदा सदस्याने ठरावावर मत दिल्यानंतर, त्या सदस्याला नंतर त्यात बदल करण्याची परवानगी दिली जाणार नाही;
५. ज्या सदस्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेपूर्वी रिमोट ई-मतदानाने आपले मत नोंदवले आहे, त्यांना पुन्हा मतदान करण्याचा हक्क असणार नाही;
६. जे सदस्य वार्षिक सर्वसाधारण सभेत उपस्थित असतील आणि ज्यांनी रिमोट ई-मतदानाद्वारे ठरावांवर आपले मत दिलेले नाही, त्यांना तसे करण्यास अन्यथा मनाई नाही, ते वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे मतदान करण्यास पात्र असतील;
७. वार्षिक सर्वसाधारण सभेला उपस्थित राहण्याबाबत आणि पूर्वा ई-मतदान प्रणालीद्वारे ई-मतदान करण्यासंबंधीच्या सर्व शंका किंवा समस्यांसाठी, तुम्ही evoting@purvashare.com वर ईमेल लिहू शकता किंवा ०२२-४९६१४१३२ आणि ०२२-३५२२००५६ या क्रमांकांवर संपर्क साधू शकता;
८. इलेक्ट्रॉनिक माध्यमांद्वारे मतदान करण्याच्या सुविधेसंबंधित सर्व तक्रारी श्रीमती दिपाली धुरी, कंप्लायन्स ऑफिसर, पूर्वा शेअरजिस्ट्री (इंडिया) प्रायव्हेट लिमिटेड, युनिट क्र. ९, शिव शक्ती इंडस्ट्रियल इस्टेट, जे. आर. बोरिचा मार्ग, लोअर परळ (पूर्व), मुंबई - ४०००११ यांच्याकडे पाठवाव्यात किंवा evoting@purvashare.com वर ईमेल पाठवावा किंवा ०२२-०२२-४९६१४१३२ आणि ०२२-३५२२००५६ या क्रमांकांवर संपर्क साधावा.

कंपनीच्या संचालक मंडळाने वार्षिक सर्वसाधारण सभेतील रिमोट ई-मतदान प्रक्रिया आणि इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीद्वारे होणाऱ्या मतदानाची निष्पक्ष आणि पारदर्शकपणे तपासणी करण्यासाठी, कार्यरत कंपनी सचिव श्रीमती झनखाना भन्साली यांची तपासणीस म्हणून नियुक्ती केली आहे. निकाल जाहीर झाल्यानंतर लगेचच, तपासणी अहवालासह घोषित केलेला निकाल www.bombaywireropes.com या वेबसाईटवर ठेवला जाईल आणि याची माहिती बीएसई लिमिटेडला देखील कळवली जाईल.

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, एजीएमच्या उद्देशाने कंपनीची सभासद नोंदणी पुस्तिका शनिवार, ८ ऑगस्ट, २०२६ ते शुक्रवार, १४ ऑगस्ट, २०२६ (दोन्ही दिवस समाविष्ट) पर्यंत बंद राहील.

सभासदांना विनंती आहे की त्यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत दिलेल्या सर्व सूचना, विशेषतः वार्षिक सर्वसाधारण सभेत सामील होण्याच्या सूचना, रिमोट ई-मतदानाद्वारे किंवा वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान मतदान करण्याची पद्धत काळजीपूर्वक वाचावी.

संचालक मंडळाच्या आदेशान्वये
बॉम्बे वायर रोप्स लिमिटेडकरिता
सही/-
राजकुमार जी. झुनझुनवाला
ठिकाणः मुंबई **पूर्णवेळ संचालक**
दिनांकः २३ जुलै, २०२६ **डीआयएनः ०१५२७५७३**